# एप्रिल महिन्याचा परिचय

१ एप्रिल, २०२१

आत्मीय वाचक,

अखेरीस, उत्तर गोलार्धाच्या बहुतांश भागांमध्ये वसंत ऋतूचे आगमन झाले आहे. उबदार सूर्यकिरणांनी मोहित होऊन निसर्ग बहरतो आहे. ते सर्वकाही जे थंडीच्या महिन्यांमध्ये सुप्तावस्थेत असते, पुन्हा एकदा जागृत झाले आहे. रमणीय भूप्रदेशाने अनेक रंगांची शोभा दर्शविण्यास सुरुवात केली आहे. या महिन्याच्या सुरुवातीला, ४ एप्रिल रोजी, ईस्टर सणाचे आगमन नवजीवनाच्या संगतीने होणार आहे, जे मी माझ्या सभोवताली पुन्हा अस्तित्वात येताना पाहते आहे.

गेले काही महिने, माझे वास्तव्य अमेरिकेच्या नैऋत्येकडील भागामध्ये असलेल्या ॲरिझोनातील सोनोरान या वाळवंटी प्रदेशात आहे. जगातील या कोपऱ्यात वन्यफुले उमलत आहेत. लहान घुबडे, ग्रीष्म काळात इथे निवासस्थान बनवण्यासाठी मेक्सिकोहून उडून आली आहेत. वाळवंटी कासवे त्यांच्या बिळांमधून बाहेर आली आहेत; फूलपाखरांच्या क्रियाकलापाने गती घेतली आहे. कडधान्यांच्या रोपट्यांच्या शेंगांमध्ये धान्ये उगवू लागली आहेत. सागुआरो कॅक्टस् अर्थात् निवडुंगा-सारखी झाडे त्यांच्या पांढऱ्याशुभ्र मोठ्या फुलांना उमलू देण्याची तयारी करत आहेत. आणि लवकरच पांढऱ्या पंखांची कबुतरे परततील.

दक्षिण गोलार्धातील प्रदेशांमध्ये, उन्हाळ्याच्या ऊष्म्याची जागा थंडगार दिवस घेत आहेत. दिनमानाचा अवधी कमी होतो आहे तर रात्रीच्या समयात वृद्धी होत आहे. पर्णपाती वृक्षांची पानगळ सुरू होते आहे. हिवाळ्याचे आगमन होत असताना निसर्ग अंतराल घेण्यासाठी स्वतःला तयार करतो आहे, अंतरी वळण्यासाठी तो स्थिरावतो आहे.

मी व्यापकतेने दूरवर जेव्हा पाहते, तेव्हा मला सर्वाधिकतेने अचंबित करणारी गोष्ट असते, निसर्गाची लवचिकता आणि हिवाळ्यातील थंडीच्या आणि उन्हाळ्याच्या प्रखर ऊष्म्याच्या अनुकूल बनण्याची त्याची क्षमता, तसेच अत्यधिक दुष्काळ आणि त्या मागोमाग येणाऱ्या मुसळधार पावसाशी जुळवून घेण्याची त्याची क्षमता. निसर्ग त्याच्या असंख्य रूपांमध्ये विस्तारतो आणि संकोच पावतो. तो कधीच निष्क्रिय राहत नाही; तो अव्याहतपणे स्वतःला नवचैतन्यमय करत असतो, नवजीवनात पदार्पण करत असतो.

साधनेची अशीच एक गतिशील प्रक्रिया असते. आपण जेव्हा आपल्या आकांक्षांना नवीन करतो, आपली उद्दिष्टे स्पष्टपणे व्यक्त करतो आणि सिद्धयोग अभ्यास करण्याचे आपले प्रयास सशक्त करतो,

तेव्हा आपण आपले जीवन नवचैतन्याने, शक्तीने आणि प्रेरणेने भरून टाकतो. माझा प्रत्यक्ष अनुभव असा आहे की, साधनेतील माझ्या प्रयत्नांचे निरंतर मूल्यांकन करून, ज्या गोष्टींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, त्यांमध्ये बदल करून, मी आत्मसन्मानयुक्त आणि सेवामय असे अधिक चांगले आयुष्य जगू शकते.

या वर्षाच्या सुरुवातीला मी माझे स्वतःचे अभ्यास पुन्हा शक्तिपूरित करण्याचे ठरवले. प्रत्येक महिन्यात सिद्धयोग वेबसाइटवर प्रकाशित होणाऱ्या एका स्तोत्राचा अभ्यास मी करेन. ही सर्व स्तोत्रे म्हणजे परमेश्वरासोबतचे अत्यानंददायी संवाद आहेत, ज्यांची रचना अशा महात्म्यांनी केली आहे, ज्यांचे जीवन परमानंदाने आणि कृतज्ञतेने सिक्त झाले आहे.

एप्रिलमध्ये येणाऱ्या श्री हनुमान जयंतीच्या निमित्ताने, गेल्या महिन्यात मी शिकण्यासाठी आणि अभ्यास करण्यासाठी श्रीहनुमानचालिसा या स्तोत्राची निवड केली. दररोज सकाळी, या स्तोत्राचे गायन मी अनेक वेळा केले आणि असे केल्यामुळे त्याच्या स्थिर स्वरमाधुर्याने माझा ताबा घेतला. मला जाणवले की, मी माझ्या स्वतःच्याच बळामध्ये मृदुलतेने स्थित होते आहे, ताठ उभी राहते आहे व अधिक मोकळा श्वास घेते आहे. प्रभू श्रीरामाप्रति असलेल्या श्री हनुमानाच्या अविचल भक्तीची कथा जाणून घेण्यासाठी, मी महर्षी वाल्मीकी रामायणाचे अत्यंत सुंदर असे संक्षिप्त भाषांतरदेखील वाचले. महाबलवान वानरयोद्धा हनुमान, हे वायुपुत्र आहेत. ते निसर्गाची अशी दिव्य शक्ती आहेत, की, ते जिथे जातात तिथे नीतिमत्ता आणि धर्म यांची पुनःस्थापना करतात. कथेतील एका प्रसंगी तर श्री हनुमान प्रभू श्रीरामांची सेवा करण्यासाठी, संपूर्ण पर्वत आपल्या खांद्यावर घेऊन भूखंडांवरून उड्डाण करतात.

दररोज, माझ्या खिडकीतून मी जेव्हा बाहेर दृष्टिक्षेप टाकते, तेव्हा सँटा कॅटालिना पर्वतांचे आभाळात आरोहण केलेले उभे अखंड सुळके माझ्या अगदी समोर दिसतात, जे सभोवतालच्या कित्येक मैलांच्या परिसरातील निसर्गदृष्यावर वर्चस्व गाजवतात. ही उत्तुंग पर्वतशिखरे जणू माझा श्वास रोखून ठेवतात. कधीकधी सूर्य त्यांच्यावर सोनेरी व गुलाबी वर्णछटांची उधळण करतो; तर इतर वेळी ती शिखरे तीक्ष्ण असल्यासारखी जाणवतात जणू एखाद्या अमंगलाचे सूचक असावे. त्यांच्या सान्निध्यात राहिल्याने मला धरतीशी आणि सर्व प्राणिमात्रांशी माझे नाते असल्याचे जाणवते.

आज या पर्वतराजींकडे पाहताना आणि श्री हनुमानावर चिंतन करताना, मला याचे आकलन होते आहे की, पर्वत उचलून नेण्याचे बळ त्यांना कशामुळे प्राप्त झाले असावे. ते आहे प्रभू रामचंद्राप्रति असलेले त्यांचे प्रेम, ज्यांचे पावन नाम श्री हनुमानाच्या शरीरातील प्रत्येक कोशिकेमध्ये निनादते आहे. या विचारासह मी माझे डोळे बंद करते आणि अंतरी त्या प्रेमाकडे वळते, जे प्रेम माझ्या परमप्रिय श्रीगुरुमाईंच्या कृपाप्रसादाने माझ्यात जागृत झाले आहे.

***

या महिन्यात येणारे व सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर प्रस्तुत केले जाणारे काही मुख्य महोत्सव व कार्यक्रम खाली दिल्याप्रमाणे आहेत.

**एप्रिल महिन्यातील महोत्सव आणि कार्यक्रम**

**गुढीपाडवा : १२ एप्रिल [भारतात १३ एप्रिल]**

गुढीपाडवा हा सण नववर्ष दिवस म्हणून महाराष्ट्रात साजरा केला जातो, तसेच भारताच्या इतर भागांमध्ये जसे की कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि मणिपूर येथेही हा सण साजरा केला जातो [जिथे त्याला इतर नावांनी संबोधले जाते, जसे की 'उगादी', 'युगादी' आणि 'चेटी चण्ड' ]. गुढीपाडव्याच्या दिवशी लोक गुढी उभारतात. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर चौदा वर्षांच्या वनवासातून परतलेल्या प्रभू रामचंद्रांचा अयोध्येचा राजा म्हणून राज्याभिषेक करण्याचा स्मरणोत्सव म्हणून हा सण साजरा केला जातो. गुढीपाडवा हा वर्षातील अत्यंत शुभ अशा साडेतीन मुहुर्तांपैकी एक मानला जातो.

**पृथ्वी दिवस [अर्थ डे] २०२१ : २२ एप्रिल**

पृथ्वी दिवसाची [अर्थ डे] स्थापना एकावन्न वर्षांपूर्वी म्हणजे वर्ष १९७०मध्ये झाली आणि आज अब्जावधी लोक दरवर्षी पृथ्वी दिवसाच्या [अर्थ डे] उपक्रमांमध्ये भाग घेतात आणि त्याला जगातील सगळ्यात मोठा नागरी रिवाज बनवतात. हा महत्त्वाचा उपक्रम आपल्यासाठी एक संधी असते, क्षणभर थांबून आपले पालनपोषण करत असलेल्या निसर्ग जगताच्या भव्यदिव्यपणावर चिंतन करण्याची आणि परमेश्वराच्या सृष्टीचे संरक्षण करण्यात आपल्या असलेल्या भूमिकेचा आदर करण्याची.

**हनुमान जयंती : २६ एप्रिल [भारतात २७ एप्रिल]**

हा महोत्सव प्रभू रामचंद्रांचे चिरंजीवी, एकनिष्ठ सेवक श्री हनुमानांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर तुम्हाला या महोत्सवाचे वर्णन, चित्रांचा संग्रह आणि श्री हनुमानाच्या कथा आढळतील, ज्यांच्या अविचल भक्तीने त्यांना एक अजिंक्य योद्धा तसेच पराक्रम, ज्ञान आणि सामर्थ्य यांचे मूर्तरूप बनवले. संतकवी तुलसीदास रचित अत्यंत लोकप्रिय आणि श्रद्धास्थानी असलेले स्तोत्र श्री हनुमानचालिसा, ज्याचा मी अभ्यास करते आहे, हे परंपरेनुसार या दिवशी गायले जाते. यातल्या एका श्लोकामध्ये तुलसीदास प्रकट करतात की बलशाली नायक

हनुमान यांचे स्मरण केल्याने व त्यांचे आवाहन केल्याने सर्व संकटांचे विमोचन होते आणि सर्व दुःखांचा नाश होतो.

***

या महिन्यात मी तुम्हाला शुभेच्छा देते की, निसर्गजगतात ज्या अद्‌भुत रूपांमध्ये परमेश्वर प्रकट होतो त्यांचा तुम्ही अनुभव घ्यावा. त्याच प्रकारे निसर्ग स्वतःला निरंतर नवे रूप देत असतो आणि नवचैतन्यमय करत असतो. तेव्हा तुम्हाला ही शुभेच्छा की, तुम्ही तुमच्या साधनेलाही नवचैतन्याने व आनंदाने ओतप्रोत करावे.

आदरपूर्वक,
मेनकी क्लार्क

© २०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.